
पारावरच्या गप्पा

# कसं सुटेल दूध व्यवसायाला लागलेलं ग्रहण?



**ग**णपत देवदर्शन घेऊन पारावर बसला होता. संपतही देवदर्शन घेऊन गणपतजवळ येऊन बसत म्हणाला, ''काय गंपा, आज फारच लवकर आला वाटतं?''

यावर हसत गणपत म्हणाला, ''हो रं संपा, आज डेअरीला दूध घातलं, म्हटलं घरी जाऊन परत येण्याऐवजी जावं दर्शन घेऊन. आता काय पाऊस-पाणी झाल्यामुळे पिकं उभी झाली. त्यामुळे सध्या काही जास्त धावपळ नाही. फक्त गायींची उठाठेव करायची आणि डेअरीला दूध घालायचं एवढंच काम सध्या आहे. कधी कधी तर वाटतंय, हे कामही बंद करून टाकावं. दररोज उठलं की आहेच गोठ्यातील काम! त्यांचं चारा-पाणी, दूध काढणे, ते डेअरीला घालणे! आरं संपा, आपण जेवढं काम दूध व्यवसायामध्ये करतो तेवढे काम इतर व्यवसायांमध्ये केलं तर जास्त पैसे मिळतील बघ. आजकाल तर दूध व्यवसाय फारच अवघड होऊन बसलाय. मागील दोन वर्षे तर करोनामुळे दुधाला भाव नाही- कारण मागणी नाही, अशी बोंब होती. लोक काय बिनदुधाचे राहात होते काय? इकडून तिकडून करोना गेला, दुधाचे भाव थोडे वाढले तर चारा- खाद्यांचे भाव गगनाला भिडले. दोन-चार रुपये दुधाचे भाव वाढत असताना चारा- खाद्याचे भाव मात्र त्याच्या कितीतरी पट वाढले. दूध धंद्याचे काम करायला मजूर मिळत नाहीत. एकवेळ शेतीच्या कामाला मजूर तयार होतो पण त्याला म्हटलं की गायींचे काम आहे तर तो आपल्याकडे कामाला येण्याचेच नाव घेत नाही. दूध धंदा म्हणजे घरातून पैसा घालून चालवायचा विषय झाला. परंतु एकदम हा व्यवसाय सोडून देता येईना. कारण यावर आपण एवढा खर्च केला, गोठा बांधला, चारा कटर, दूध काढायचं मशिन घेतलंय. एवढा खर्च करून आता हा व्यवसाय बंद करणंसुद्धा जीवावर येतंय बघ संपा. मला तर काहीच कळत नाही. बायको-पोरं म्हणतात की टाका बंद करून हा दूध धंदा. पण माझी काय मनाची तयारी होईना बघ.''

गणपत बोलतच होता आणि संपत त्याच्याकडे फक्त बघत होता. खरं तर ही फार मोठी शोकांतिका आहे सर्वच दूध उत्पादकांची. परंतु यातून बाहेर पडणे शक्य होत नाही. दूध व्यवसायाची गंमत चक्रव्यूहामध्ये अडकलेल्या अभिमन्यूसारखी झालेली आहे.

संपत गणपतच्या मांडीवर हात ठेवत म्हणाला, ''हे बघ गंपा, तू म्हणतो ते अगदी शंभर टक्के बरोबर आहे. परंतु आपण दूध व्यवसायामध्ये ४०-५० वर्षांपासून आहोत बघ. आपल्या आई-वडिलांनी सुद्धा हा व्यवसाय केला परंतु तो वेगळ्या पद्धतीने. शेतीतून पिकाचे उत्पादन घ्यायचे आणि शेतीला पूरक असा दूध व्यवसाय करायचा

हे सूत्र पहिल्यापासून होते. याची मुख्य दोन कारणे होती. एक तर शेतामधून निघालेला कोणत्याही प्रकारचा चारा; मग ते पिकातील गवत असो की पिकांचे अवशेष- त्याचा वापर ते गायीचा चारा म्हणून करत होते. याव्यतिरिक्त ते फक्त पेंड विकत आणून खाऊ घालत होते. दुसरा महत्त्वाचा विषय म्हणजे घरामध्ये माणसांचे प्रमाण जास्त होते. एकत्रित कुटुंब पद्धत, घरातील महिला तसेच मुलांना काहीतरी काम पाहिजे असायचे आणि ते काम होते दूध व्यवसायाचे. म्हणूनच आजही दूध व्यवसाय हा घरातील महिला आणि मुलांवरच जास्त अवलंबून आहे. हळूहळू तणनाशके आली. त्यामुळे शेतातील गवत कमी होऊ लागले. जो चारा मोफत मिळत होता तो आता वेगळ्या जमिनीत पिकवावा लागतो किंवा विकत घ्यावा लागतो. दुसरा महत्त्वाचा भाग म्हणजे आता कुटुंबं लहान झालीत. लग्न करून घरात येणाऱ्या नवीन मुली दूध व्यवसायाचे काम करायला सहजासहजी तयार होत नाहीत. अनेक कुटुंबातील मुले नोकरीनिमित्त बाहेर जात आहेत. यामुळे दूध व्यवसायाला वेगळे स्वरुप येऊ लागले आहे. पारंपरिक पद्धतीमधील गायींचे संगोपन आता एक व्यावसायिक आणि व्यापारी पद्धतीचे काम झाले आहे. कमी कष्ट, कमी श्रम, कमी वेळेत जास्त दूध उत्पादनासाठी गायींच्या गोठ्यात सुधारणा झाली आणि यांत्रिकीकरण आले. यामुळे तसे बघता मागील १०-१५ वर्षांत दूध व्यवसायामध्ये चांगली प्रगती होत होती. तरुण वर्ग दूध व्यवसायाकडे आकर्षित होत होता. या व्यवसायामध्ये आपले करिअर करण्याचे स्वप्न पाहून- यात मोठी गुंतवणूक करून आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून हा व्यवसाय सुरू होता. परंतु दिवसेंदिवस उत्पादन खर्चात होत असलेल्या वाढीनुसार दुधाचे दर वाढले नाहीत. मागील १०-१५ वर्षांत उत्पादन खर्चात दुप्पट वाढ झाली तर दुधाच्या दरात ४० ते ५० टक्के वाढ झाली. यामुळे हा व्यवसाय आता फायदेशीर होत नाही ही वस्तुस्थिती आहे. दुधाचे उत्पादन वाढले परंतु दुधाला मागणी नाही या मुद्द्यावरून दूध व्यवसाय करणाऱ्या संस्था दूध उत्पादकांना योग्य दूध दर देत नाहीत.''

गणपतने संपतला मध्येच थांबवले व म्हणाला, ''म्हणजे तुला काय म्हणायचेय संपा, आपल्याकडे दुधाचे उत्पादन मागणीपेक्षा जास्त आहे? मग दुधाचे उत्पादन जास्त आहे तर सरकार दूध उत्पादन वाढविण्यासाठी प्रोत्साहन का देते? बँका कर्ज का देतात? शासन घेतलेल्या कर्जावर अनुदान का देते? मला तर कळतच नाही. 'आंधळं दळतंय आणि कुत्रं पीठ खातंय' अशी परिस्थिती झाली बघ सर्वांचीच. एकीकडे लोकसंख्या वाढत असताना शेती-शेतीपूरक व्यवसायांचे उत्पादन वाढविण्यासाठी शासन शेतकऱ्यांना प्रोत्साहित करतंय. दुसरीकडे उत्पादन जास्त झाले म्हणून मागणी कमी- पुरवठा जास्त या नावाखाली मधले लोक भाव देत नाहीत. शेतकऱ्याचा भाव कमी केला जातो आणि ग्राहकाचा भाव वाढविला जातो. आताच बघ की, आपल्याला ३० रुपये दुधाला दर आणि ग्राहक मात्र ५०-५५ रुपये मोजतो. एवढे पैसे जातात कुठे? आपण एवढे कष्ट करून दुधाला तोटा होतो किंवा फार तर लिटरला १-२ रुपये मिळतात. त्यांना मात्र एका दिवसात लिटरला २०-२५ रुपये.''

यावर संपत हसत म्हणाला, ''खरं आहे गंपा. पण तू म्हणतो तसेच आहे. सरकारने डोळे झाकून घेतलेले आहेत. त्यांचा राजकारण करण्यात वेळ जातो. शेतीमाल विक्रीमधल्या मध्यस्थांवर कोणाचाही धाक नाही किंवा ते करतात योग्य त्या व्यक्तींना 'मॅनेज'. दुधाचे उत्पादन आणि मागणी यांची एकूण गोळाबेरीज केली तर दुधाच्या उत्पादनापेक्षा दुधाची विक्री जास्त होते. खरं तर सरकारने हे आकडे वरचेवर जाहीर केले पाहिजेत. राज्यात शेतकऱ्यांनी किती दूध डेअरीला घातले आणि कंपन्यांनी किती दूध विकले ही आकडेवारी समोर आली तर चक्कर येईल बघ! दुधामध्ये मोठ्या प्रमाणात भेसळ करून त्याची विक्री होत असते. शेतकऱ्यांकडून मात्र शुद्ध गुणवत्ता असलेले दूध घेतले जाते. एकदा का त्यांच्याकडून दूध पुढे गेले की त्यानंतर बोलणे अवघड. शहरामध्ये तर कृत्रिम दूध तयार करून विकले जाते. ज्या रसायनांचा मानवी आरोग्यावर अनिष्ट परिणाम होतो, त्याचा वापर करून दूध आणि दुग्धजन्य पदार्थ तयार करून विकले जातात. यामुळेच प्रत्यक्षात उत्पादित झालेल्या दुधापेक्षा दूध आणि दुधाचे पदार्थ जास्त प्रमाणात विकले जातात.''

यावर कपाळावर हात लावत गणपत म्हणाला, ''अरे देवा, कोठे फेडतील ते हे पाप, जे दुधात भेसळ करतात! वैद्यकशास्त्रात दुधाला पूर्ण अन्न म्हणून स्थान दिलेले आहे. लहान बाळापासून वयस्कर लोकांसाठी तसंच आरोग्यदायी म्हणून रुग्णांसाठी दुधाचा मोठ्या प्रमाणात वापर होतो. मग हे कृत्रिम दुधाचे सेवन केल्यामुळे फायद्याऐवजी तोटाच होत असेल. हे जे नराधम दुधात भेसळ करतात त्यांना भरचौकात फाशीची शिक्षा दिली पाहिजे.''

यावर संपत म्हणाला, ''तुझा संताप योग्य आहे गंपा. आपल्या शेजारच्या चीनने कायदा केला आहे की जो दुधात भेसळ करेल त्याला जन्मठेप किंवा फाशी दिली जाते. आपल्याकडे मात्र दुधात भेसळ करणाऱ्याला डोक्यावर घेतले जाते. कारण यातूनच अनेकांचे खिसे भरत असतात. भेसळ कोठे होते? कशी होते? त्यासाठी कोणता पदार्थ लागतो? त्याची उपलब्धता- विक्री कोठे होते? याची सर्व माहिती त्या त्या व्यवस्थेला आहे. यावर लगाम घातला आणि फक्त शुद्ध- नैसर्गिक दूध विक्री होईल यासाठी शासनाने कडक धोरण जरी घेतले तरी आज आपल्या महाराष्ट्राकडे दुधाची कमतरता होईल. दुधाची कमतरता होऊन मागणी वाढली म्हणजे आपोआप दुधाचे दर वाढतील. दुसरी महत्त्वाची बाब म्हणजे दुधाचे दर हे उत्पादन खर्चावर आधारित असावेत. दुधाचा खरेदी दर, त्यावर होणारा प्रक्रिया- विक्री खर्च याचा विचार करून दुधाचा विक्री दर ठरवला जावा. परंतु याबद्दल फक्त चर्चा होतात. कार्यवाही मात्र शून्य. यावर्षी दुधाचे दर काय राहतील तसेच दरवर्षी महागाईच्या प्रमाणात किती दर वाढवून मिळू शकेल, अशा प्रकारे नियोजन करणारी यंत्रणा दूध उत्पादकांसाठी उभी केली तर या व्यवसायाला कोठेतरी स्थैर्य येईल.''

मध्येच गणपत म्हणाला, ''कारं संपा, हे समजा झालं नाही तर दूध धंदा संपेल असे वाटते तुला?''

गणपतच्या मांडीवर हात ठेवत संपत म्हणाला, ''हे बघ गंपा, कोणतीच गोष्ट संपत नसते. ती वेगळे वळण घेते. दूध व्यवसाय आता मोठ्या व्यवसायाच्या स्वरुपात पुढे येत आहे. मोठे उद्योगपती, भांडवलदार यात पैसा टाकत असून त्यांनी मोठे गोठे उभारले आहेत. तसेच काही तरुण मंडळी मोठमोठे गोठे तयार करून उत्पादन खर्च कसा घटवता येईल याचा विचार करत आहेत. विशेषत: व्यवस्थापनावरील खर्च कमी करून आणि दूध व्यवसायातील मध्यस्थ कमी करून हा व्यवसाय किफायतशीर करण्यासाठी ते प्रयत्न करत आहेत. जास्त दूध देणाऱ्या गायी, टोटल मिल्क रेशन (टीएमआर), भ्रूणरोपण तंत्रज्ञान (ईटीटी), बलक कुलर, मिल्किंग पार्लर यासारख्या नवनवीन तंत्रज्ञानांचा वापर करून हा व्यवसाय पुढे घेऊन जाण्याचा प्रयत्न होत आहे. मात्र सर्वसामान्य समाज- म्हणजेच जे ७० ते ८० टक्के अल्प व अत्यल्प भूधारक शेतकरी आहेत, ज्यांच्याकडे ४-५ गायी आहेत त्यांची मात्र यामध्ये वाताहत होईल. त्यांनी वेळीच बदल केला नाही तर मात्र हा व्यवसाय लहान शेतकऱ्यांकडून भांडवलदारांकडे जाईल. एकदा का व्यवसाय त्यांच्याकडे गेला तर त्यानंतर त्यांचे संघटन होऊन मोनोपॉली होईल. ते सांगतील त्या दराने ते दूध विकतील आणि ग्राहकही घेतील. शासनही हस्तक्षेप करणार नाही. म्हणून गंपा, खरं तर आपणच संघटित होऊन यावर सर्वांना जाब विचारला नाही, आवाज उठवला नाही तर मात्र भविष्याबद्दल काहीही सांगता येत नाही. चला उठा, चहा घेऊ आणि लागू कामाला...''

**(सौजन्य : 'पूर्वा कृषिदूत' परिवार)** ■

---

## लेखकांना आवाहन...

**'पूर्वा कृषिदूत'** परिवाराशी आपण गेली काही वर्षे लेखक या नात्याने निगडित आहात, याचा मन:पूर्वक आनंद वाटतो. आपले लेखन प्रसिद्ध झालेला अंक आमच्याकडून दर महिन्यात अवश्य पाठवला जातोच. मात्र काही वेळा निवासी पत्त्यात झालेला बदल, अपूर्ण पत्ता यांमुळे आपल्याकडे पाठवलेला अंक परत येतो. याकरिता शक्यतो लेखासोबत आपला सविस्तर पत्ता मोबाईल नंबरसह नमूद करावा ही विनंती.

तसेच आपला पासपोर्ट आकाराचा फोटोही जरुर पाठवावा. आपले लेखन सहकार्य असेच लाभत राहील याची खात्री आहेच; आपल्या नवीन उपक्रमांना तसेच व्यक्तिगत, व्यावसायिक संकल्पांना आमच्या हार्दिक शुभेच्छा.

आमचा पत्ता : पूर्वा कृषिदूत, एम-११३, एम.आय.डी.सी., अंबड, नाशिक- ४२२०१० (महाराष्ट्र).
email:poorvakrushidoot@gmail.com

**- संपादक, 'पूर्वा कृषिदूत'**